महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

### राष्ट्रीय मतदार दिन

### अहवाल (मंगळवार, 27 जानेवारी, 2026)

आज मंगळवार, दि. 27 जानेवारी, 2026 रोजी राज्यशास्त्र विभागामध्ये राज्यशास्त्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ‘राष्ट्रीय मतदार दिन’ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अंगद पाटील यांनी केले. आपल्या प्रस्ताविकेमध्ये त्यांनी ‘राष्ट्रीय मतदार दिन’ साजरा करण्यामागील हेतू स्पष्ट केला आणि लोकशाहीमध्ये मतदारांची भूमिका किती महत्वाची आहे याचे विवेचन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात मतदारांचे लोकशाही व्यवस्थेमधील स्थान आणि महत्व यांचे विस्ताराने विवेचन केले. लोकशाहीचे अस्तित्व हे मतदारांच्या सहभागावरच अवलंबून असते. म्हणून लोकशाही जिवंत ठेवण्यामध्ये मतदारांनी कशा प्रकारे सजग राहिले पाहिजे हे सांगून त्यांनी आजच्या काळात मतदारांनी मतदान करताना कोणत्या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत याविषयी विस्ताराने मार्गदर्शन केले. त्यानंतर हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रकाश आठवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदान करण्याविषयी शपथ दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाच्या प्रा. आश्विनी थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी मराठी विभागाचे प्रा. एकनाथ पाटील, हिंदी विभागाचे डॉ. जावेद शेख उपस्थित होते.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409




उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. संतोष खडसे, विचारमंचावर प्रा. एकनाथ पाटील आणि डॉ. प्रकाश आठवले.




मतदानाचा हक्क बजाविण्याची शपथ घेताना उपस्थित मान्यवर व विद्यार्थी